स्थापना: १९९४

☎ 02488-251411

" स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद"-कर्मवीर
रयत शिक्षण संस्थेचे,

# श्री केदारेश्वर विद्यालय, बाभुळवाडे

ता. पारनेर, जि. अहमदनगर, पिन-४१४३०२

संस्थापक :- पद्मभुषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील (डी.लिट)

| E-mail:- babhulwade.skvnr@gmail.com | UDISE CODE-27260701905 | S.S.C. Code No.-12-07-039 |
|---|---|---|
| Pay Unit Code No. 0538 | माध्य. ३ प्रथम मान्यता/पुवि.२०१/९५/दि. १९/४/९५ | New Pay Unit Code No. 04540100711 |


जावक क्र.६६/2024-25 दिनांक:29/८/२०२४

प्रति,

मा.खासदार निलेशजी लांकेसाहेब,

अहमदनगर लोकसभा मतदारसंघ, अहमदनगर.

**विषय:- ठाकरवाडी ते बाभूळवाडे विद्यार्थी वाहतुकीसाठी मिनी-स्कूल बस मिळणेबाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयान्वये विनंतीपूर्वक कळवू इच्छितो की श्री केदारेश्वर विद्यालय बाभूळवाडे हे विद्यालय दुर्गम भागात व मुख्य रस्त्यापासून दूर असून विद्यालयात १५३ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. यापैकी ४५ विद्यार्थी हे आदिवासी ठाकर समाजाचे असून ठाकरवाडी(बाभूळवाडे) ता. पारनेर येथील रहिवाशी आहेत. या विद्यार्थ्यांचा विद्यालयात येण्याचा सुमारे ६ किमी लांबीचा मार्ग अतिशय खडतर व जंगलव्याप्त असून या भागात वन्य प्राण्यांचा मोठ्या प्रमाणात वावर आहे.

परिणामी या विद्यार्थ्यांना विद्यालयात ये-जा करणे अत्यंत अवघड असून त्याचा गंभीर परिणाम त्यांच्या शिक्षणावर होत आहे. या मुलांच्या गैरहजेरीचे प्रमाणही जास्त आहे. तरी या विद्यार्थ्यांना विद्यालयात ये-जा करण्यासाठी विद्यालयास मिनी-स्कूल बस मिळावी ही नम्र विनंती.

कळावे

आपला विश्वासू,

मुख्याध्यापक
श्री केदारेश्वर विद्यालय, बाभुळवाडे
ता. पारनेर, जि. अहमदनगर